REGISTERED No. B. 3434




# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २१ जुलै, १९४८ | अंक २९

श्री——श्री——श्री——श्री——श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री——श्री——श्री——श्री——श्री

वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८′—१०″)
संपूर्ण देशी. पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत साधनांनीं बनविलेला
—चौकशी स्थान—
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

# विविध माहिती

**पाकिस्तान सरकारनें निर्बंध रद्द केले**—व्यापाराचा ओघ अप्रतिबंध चालावा म्हणून पाकिस्तान सरकारनें कॉस्टिक सोडा, आयात केलेले साबण, टायर्स व ट्यूब्स् ह्यांच्या वहातुकीवरील व खरेदी-विक्रीवरलि निर्बंध ता. १५ जुलैपासून रद्द केले आहेत. वरील जिनसा ह्या तारखेपासून पाकिस्तानांतल्या पाकिस्तानांत कोठेंही पाठवितां येतील. ही सवलत तीन महिनेपर्यंतच चालू रहाणार आहे.

**खानदेशांत कोळसा ?**—धुळे तालुक्यांतील सटाणे ह्या गांवीं विहीर खणतांना कोळसा सांपडल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. विहिरींतील मातीचीं ढेकळें कोळशासारखीं जळतात असें आढळून आल्यानें खात्री करून घेण्यासाठी कांहीं नमुने तज्ज्ञांकडे तपासणी करण्यासाठी पाठविण्यांत आले आहेत.

**मुंबई प्रांतासाठी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन**—मुंबई प्रांतांतील ग्रामोद्योगांना उत्तेजन देण्याच्या हेतूनें एक प्रांतिक इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा विचार मुंबई सरकार करीत आहे. कॉर्पोरेशनउद्योगधंद्यांना लागणारें भांडवल पुरविणार आहे. तथापि, त्यांतल्या त्यांत ग्रामोद्योगांना अधिक सवलतीनें वागविण्यांत येईल. कॉर्पोरेशनची घटना व कामकाज मध्यवर्ती सरकारच्या कॉर्पोरेशनच्या धर्तीवर राहील.

**जर्मन शास्त्रज्ञांकडून अणुबाँबसंबंधीं संशोधन**—जर्मनीमधील कांहीं प्रसिद्ध शास्त्रज्ञ रशिआंत अणुबाँबसंबंधीं प्रयोग करीत आहेत. बर्लिनमधील विल्यम कैसर इन्स्टिट्यूटमधील माजी प्रोफेसर गुस्टाव्ह हर्टझ हे त्यांपैकीं एक आहेत. संशोधनाचें केंद्र काळ्या समुद्राच्या कांठीं आहे, असें समजतें. ह्या शास्त्रज्ञांवर कडक पहारा असून त्यांची वेगळी वसाहतच वसविण्यांत आली आहे. त्यांना दरमहा १०,००० ते १५,००० रूबल पर्यंत पगार देण्यांत येतो, असेंहि कळतें.

**विमानानें माशांचा पुरवठा**—बंगालमधील त्रिपुरा संस्थानच्या हद्दींतील आगरताळा येथून कलकत्त्याला ५० मण मासे विमानानें नुकतेच नेण्यांत आले. आगरताळ्यापासून कलकत्ता १७० मैल आहे. विमानानें माशांची वहातूक करण्याच्या ह्या प्रयत्नांशीं पूर्व व पश्चिम बंगालच्या सरकारांनीं सहकार्य करण्याचें कबूल केलें आहे. पूर्व बंगालमधील तिप्पेरा जिल्ह्यांतून मोठ्या पाण्यांतील मासे धरून ते तीन दिवस लागोपाठ कलकत्त्याला पाठविण्यांत आले. तिसऱ्या दिवशीं ६५ मण मासे नेण्यांत आले. कलकत्त्याला विमानानें मासे नेण्याचा हा पहिलाच प्रयोग आहे. कलकत्ता शहराला रोज ८,००० मण मासे लागतात. सध्या रोज अवघा २,५०० मण पुरवठा होऊं शकतो.

**हिंदी रेल्वेसाठी एंजिनें**—हिंदी रेल्वेच्या स्टँडिंग फायनॅन्स कमिटीची बैठक नुकतीच भरली होती. कमिटीनें अमेरिकेकडून २०० रेल्वे एंजिनें घेण्याचा, कल्याण येथील जी. आय. पी. रेल्वेच्या विजेच्या केंद्राचा विस्तार करण्याचा आणि पाचोरा जामनेर रेल्वे विकत घेण्याचा, असे निर्णय घेतले. मुंबई व मध्यप्रांत ह्या प्रांतांतील रस्त्यावरील वहातुकींत रेल्वेजनीं घेतलेल्या भागालाही मंजुरी देण्यांत आली. दिल्ली—मथुरा रेल्वे जोडरुळाची करण्याला मंजुरी देण्यांत आली. ह्या शिवाय रेल्वे कारखान्यांसाठी नवीन मशिनरी घेण्याचेंही ठरलें.

**म्हैसूरमधील सोन्याच्या खाणी**—म्हैसूर संस्थानांत चार सोन्याच्या खाणी असून त्या सर्वांच्या कचेऱ्या लंडनला आहेत. म्हैसूर सरकारच्या उद्योग खात्याचे माजी मंत्री श्री. श्रीनिवासन ह्यांना ह्या कंपन्यांच्या संचालक मंडळावर पहिले हिंदी डायरेक्टर म्हणून बोलविण्यांत आलें आहे. त्यांनीं ह्या आमंत्रणाचा स्वीकारही केलेला आहे. श्री. श्रीनिवासन ह्यांना कोलार येथील सोन्याच्या खाणींची उत्तम माहिती आहे. कोलारमधील खाणींतील मजुरांच्या स्थितीविषयीं त्यांनीं २० वर्षांपूर्वी केलेला अहवाल फार महत्त्वाचा ठरला होता. सोन्याच्या खाणीच्या धंद्याविषयीं त्यांना विशेष आस्था आहे. बेल्लारा येथील संस्थानच्या मालकीची सोन्याची खाण त्यांच्याच पुढाकारानें सुरू झाली.

**पाकिस्तानची कापडाची खरेदी**—पाकिस्तान हिंदुस्थानकडून आणि रशिआ, झेकोस्लोव्हाकिआ, जपान इत्यादि देशांकडूनहि कापड विकत घेत आहे. सुमारें २ कोटी वार कापड आयात करण्याच्या वाटाघाटी पूर्ण झाल्या आहेत. झेकोस्लोव्हाकिआकडून १ कोटी, २० लाख रुपयांना ५० लाख वार कापड विकत घेण्याचें ठरलें आहे. हें कापड बहुधा जानेवारी, १९४९ मध्यें पाकिस्तानांत येईल. रशिआकडूनहि ५० लाख वार कापड घेण्याच्या वाटाघाटी पूर्ण होत आल्या आहेत. जपानकडून कापडाच्या व सुताच्या ८,००० गाठी पाकिस्ताननें विकत घेतल्या आहेत. त्यांपैकीं ५,००० गाठी पूर्व-पाकिस्तानसाठी ठेवल्या आहेत. हिंदुस्थानकडून कापड घेण्याचा सौदा करण्यासाठी पाकिस्तानचे टेक्सटाइल कमिशनर नुकतेच मुंबईला आले होते.

**माळव्यांत नवें धरण**—माळवा सरकार चंबळ नदीवरील धरणाच्या योजनेस सध्यां अखेरचें स्वरूप देत आहे. ग्वाल्हेर व इंदूर ह्यांच्या दरम्यान चौरसीगड येथें चंबळ नदीवर एक धरण बांधण्यांत यावयाचें आहे. ह्या धरणाला पूरक अशीं आणखी दोन धरणेंही बांधण्यांत यावयाचीं आहेत. मुख्य धरणाला पूर्ण होण्यास ५ वर्षें लागतील; खर्च ९ कोटी रुपये येईल. धरणाची भिंत २०० फूट उंचीची होईल. सर्व धरणांना मिळून २५ कोटी रुपये खर्च येईल, आणि योजना पुरी झाल्यावर राजस्थानांतील व माळव्यामधील ३ लाख एकर नवी जमीन धरणाच्या पाण्यानें भिजवितां येईल.

**सहकारी गृहसंस्थांचा व्याप वाढणार**—मुंबई सरकारचे अर्थमंत्री श्री. व्ही. एल. मेहता ह्यांनीं नुकतेंच असें जाहीर केलें कीं, सहकारी गृहसंस्थांचा व्याप व विस्तार वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. आतापर्यंत सहकारी गृहसंस्थांच्या योजना मुंबई, पुणें, अहमदाबाद, सोलापूर व हुबळी ह्या मोठ्या शहरांपुरत्याच मर्यादित होत्या. परंतु ह्यापुढें इतर मोठ्या शहरांना व खेड्यांनाहि त्या लागू करण्याचा सरकारचा विचार त्यांनीं जाहीर केला.

-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २१ जुलै १९४८




प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## योजनांचें यश प्रत्यक्ष कृतीवरच अवलंबून आहे

### नफा-वाटणी, का उत्पादन-बोनस?

हिंदुस्थान सरकारनें नेमलेली एक तज्ज्ञ समिती मालक व मजूर ह्यांचेमधील नफा-वाटणीच्या योजनेचा विचार करीत आहे. मालक आणि मजूर ह्या दोघांचाहि अशा प्रकारच्या योजनेस विरोध दिसून येत आहे, परंतु सरकार मात्र आपल्या मूळ मतास चिकटून राहिलें आहे. समितीमध्यें सरकारी प्रतिनिधींचें संख्याधिक्य असल्या कारणान, सरकारी मताचा प्रभाव समितींत पडल्याविना रहाणार नाहीं. (१) हिंदुस्थान सरकारनें मोठ्या भांडवली खर्चाच्या कित्येक औद्योगिक योजना आखल्या आहेत आणि खासगी प्रयत्नहि त्या दिशेनें होत आहेत. ह्या सर्वांस लागणारें भांडवल मिळण्यासाठी पोषक अशा वातावरणाची आवश्यकता आहे; म्हणजे पैसा पुरविणारांस त्यांच्या पैशाबद्दल व त्यावरील व्याजाबद्दल सुरक्षितता वाटली पाहिजे. (२) जादा नफ्यामध्यें मजुरांना वाटा द्यावयाचा, तर तोटा येईल तेव्हां तो भरून निघण्याचीहि हमी आवश्यक आहे. (३) खासगी म्हणजे बिगर-सरकारी उपक्रमांचे तोटे सरकारनें भरून देणें अव्यवहार्य ठरेल. (४) सध्या ज्यांचे हातीं कंपन्यांचे शेअर्स आहेत, ते सर्व कांहीं त्यांचे मूळ धारक नव्हेत. डिव्हिडंड मर्यादित केल्यास शेअर बाजार कोलमडून पडेल व शेअर्स धारण करणारांवर संकट येईल. (५) उद्योगधंद्यांत गुंतलेल्या भांडवलाचा आंकडा निश्चित करणें कठीण आहे; कारण युद्धापूर्वीं गुंतविलेलें व गेल्या तीन वर्षांत गुंतविलेलें भांडवल ह्याची उत्पादन शक्ती एकाच मापानें मोजली गेली तरी त्यास पडलेली किंमत वेगवेगळी आहे. (६) अपेक्षेपेक्षा फारच कमी नफ्याचा वाटा मजुरांच्या वाट्यास येणार आहे. (७) वेगवेगळ्या उद्योग-धंद्यांतील व कारखान्यांतील मजुरांस एकाच प्रमाणांत नफा वाटणी मिळणार नाहीं. (८) नफा वाटणीमुळें उत्पादनास चालना मिळणार नाहीं. (९) नफा वाटणीचे प्रयोग इतर देशांत अयशस्वी ठरले आहेत. नफा वाटणीस मालक वर्गाचा विरोध वरील कारणांसाठी मुख्यत: आहे आणि उत्पादनाचे प्रमाणांत बोनस देण्याची योजना तो वर्ग सुचवीत आहे.

शेअर बाजाराचें, तज्ज्ञ कमिटीच्या निर्णयाकडे लक्ष लागून रहाणें स्वाभाविकच आहे. मुंबई स्टॉक एक्सचेंज असोसिएशनच्या वार्षिक सभेंत भाषण करतेवेळीं, तिचे अध्यक्ष श्री. के. आर. पी. श्रॉफ ह्यांनीं ह्या प्रश्नाचा अर्थातच उल्लेख केला. "हा आभास आपणांस पकडून, शब्दांच्या चौकटींत बंदिस्त ठेवतां येईल, अशी वेडी आशा बाळगण्यांत येत आहे. योग्य किंमत जशी असूंच शकत नाहीं, त्याचप्रमाणें योग्य नफा व योग्य व्याज ह्याहि गोष्टी अव्यवहार्य आहेत," असें ते म्हणाले. उत्पादनावर मजुरांना बोनस द्या, म्हणजे उत्पादनास गति प्राप्त होऊन मालाचा पुरवठा वाढला म्हणजे राष्ट्रीय संपत्तींत भर पडेल, प्रत्येकाच्या वाट्यास ती अधिक प्रमाणांत येईल व मजुरांच्या रहाणीचें मानहि वाढेल, असा श्री. श्रॉफ ह्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. "नियोजन" हा शब्द कितीहि आकर्षक वाटला, तरी कष्ट केल्याविना इच्छिताची प्राप्ती होणार नाहीं. कांहींहि योजना आखल्या आणि प्रार्थना केल्या, तरी घाम निघेपर्यंत काम करणें हाच आपल्या आर्थिक उद्धाराचा पाया रहाणार आहे. ही गोष्ट दृष्टीआड करणें, म्हणजे नाश ओढवणें होय. अशा स्पष्ट शब्दांत त्यांनीं कागदी योजनांवर टीका केली आहे. प्रत्येकानें शक्य तेवढा उत्पादक कार्यास हातभार लावला पाहिजे, तरच कोणतीहि योजना यशस्वी होऊं शकेल. अर्थात, चांगली योजना अधिक यशस्वी होईल, हें उघडच आहे.

## हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनकडे थकलेलें येणें

### हिंद-ब्रिटन करारांतील मुख्य बाबी

**हिंदुस्थानानें वळती केलेली रकमः—**

| | |
|---|---|
| (१) हिंदुस्थानानें ग्रेट ब्रिटनला, त्याचेकडून हा देश सोडतेवेळीं मिळालेल्या येथील लष्करी सामुग्रीबद्दल द्यावयाची रक्कम. (त्याची पुस्तकी किंमत ५०० कोटी रु. होती.) | १३२ कोटी रु. |
| (२) हिंदुस्थानाच्या मध्यवर्ती सरकारास ग्रेट ब्रिटनमध्यें पेन्शनपायीं दरसाल ८ कोटी रुपये द्यावे लागतात. ग्रेट ब्रिटनला येत्या ६० वर्षांत द्यावे लागणारें देणें एका रकमेनें देऊन टाकण्यासाठी लागणारी रक्कम. | १९७ कोटी रु. |
| (३) प्रांतिक सरकारांनीं ग्रेट ब्रिटनमध्यें द्याव्या लागणाऱ्या वार्षिक पेन्शनची एका रकमेनें तोडून द्यावयाची रक्कम. | २७ कोटी रु. |

**ग्रेट ब्रिटननें देऊं केलेली रक्कमः—**

| | |
|---|---|
| उरलेल्या येण्यापैकीं, येत्या ३ वर्षांत ग्रेट ब्रिटननें उपलब्ध करावयाची रक्कम. (हिंदुस्थानानें माल निर्गत करून आणखी रक्कम मिळविण्यास हरकत नाहीं.) | १६० कोटी रु. |

पहिल्या वर्षी ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानास २० कोटी रुपये उपलब्ध करून द्यावयाचे आहेत. ह्या सर्व देवघेवीनंतर अद्याप १०६७ कोटी रुपये ग्रेट ब्रिटनकडून येणें रहातात! ह्या येण्यावर आपणांस ०·७८% दरानें व्याज देऊं करण्यांत आलें आहे.

ग्रेट ब्रिटननें देऊं केलेल्या स्टर्लिंग रकमेची वसुली करावयाची, म्हणजे त्या किंमतीचा ब्रिटिश माल आपण आयात करावयाचा. हिंदी कारखानदारांनीं पुरेशी ब्रिटिश यंत्रसामुग्री मागविली, तरच तें शक्य होणार. हिंदुस्थानाच्या औद्योगिक विकासाची गति पोटीं येणें वसूल करण्याइतकी आज नाहीं! कारखानदारांस भांडवल गुंतविण्यास उत्साह वाटेल, अशी परिस्थिती नसल्याचा तो परिणाम आहे. ब्रिटिश यंत्रसामुग्री इतर देशांच्या यंत्रसामुग्रीपेक्षा

महाग असल्याचें आढळल्यास त्याबाबत रदबदली करण्याचें आश्वासन हिंदी अर्थ मंत्र्यांनीं दिलें आहे. ग्रेट ब्रिटनला त्याच्या निर्गतीचे पोटीं कच्चा माल मिळणार नसल्याकारणानें, माल निर्गत करण्यास तो सहाजीकच उत्सुक नसणार. तेव्हां त्याचे-कडून मिळेल तो माल घेऊन आपली वसुली केली पाहिजे अशी परिस्थिति आहे.

पाकिस्तान व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमधील पौंडी येण्याच्या वाटा-घाटींतून निष्पन्न झालेला करार चालू आठवड्यांत प्रसिद्ध होईल.

## पश्चिम पाकिस्तानांतील बिगर-मुस्लिम बँका व विमा कंपन्या

### पंजाब नॅशनल बँकेचें महत्त्वाचें कार्य

पंजाबची फाळणी होण्यापूर्वी लाहोर शहर बँकांचें व व्यापारी व्यवसायाचें एक महत्त्वाचें केंद्र होतें. शहरांतील एकूण ९७ बँकांपैकीं फक्त ५ मुसलमानांच्या होत्या. विमा कंपन्यांच्या एकूण ८० कचेऱ्या होत्या. त्यांतील फक्त २ मुसलमानांच्या नियंत्रणाखालीं होत्या. इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट कंपन्या १७ होत्या आणि त्या सर्व बिगर मुसलमानांच्या होत्या. ५ चेंबर ऑफ कॉमर्स पैकीं १ संस्था मुसलमानांची होती. फाळणी झाल्यावर पाकिस्तानांतून भांडवल हिंदुस्थानांत स्थलांतर करूं लागलें अशा वार्ता पसरल्या. पण ऑगस्ट १९४७ अखेर पर्यंत तरी, बँकांतील खात्यांपैकीं निदान पन्नास टक्के खातीं तरी चालूच राहिलीं. तीं बंद करण्यांत आलीं नाहींत किंवा वर्गहि करण्यांत आलीं नाहींत. १५ ऑगस्ट नंतर मात्र खातीं वर्ग करण्याच्या अर्जांचा लोंढाच येऊं लागला. बँकांतील नोकर वर्ग कमी झालेला असल्यामुळें ह्या कामाला तोंड देणें कठीण गेलें. तथापि पंजाबमधील सर्वांत मोठी बँक जी पंजाब नॅशनल बँक, हिनें आपल्या खातेदारांची शक्य ती सोय पाहिली. त्यामुळेंच कित्येक निर्वासितांना हिंदुस्थानांत भणंग म्हणून न येणें शक्य झालें व ते आपल्या पायावर उभे राहूं शकले.

पाकिस्तान सरकार पंजाब नॅशनल बँकेला, तिच्या ठिकठि-काणच्या शाखांतील हिशेबाचीं पुस्तकें, कागदपत्र, रोखे इत्यादी पंजाबमधील बँकेच्या मुख्य कचेरींत आणण्यासाठीं सर्व प्रकारची मदत करीत आहे. हें साहित्य लाहोरला आल्यावर बिगर-मुसल-मानांची खातीं हिंदी संघराज्यांत बदला करण्यांत येतात. १ मे १९४८ पर्यंत एकूण २१,५९० खातीं बदला करण्यांत आलीं अगर त्यांचे पैसे देण्यांत आले; ७,१८२ बिल्स व ड्राफ्ट्सची रीतसर विल्हेवाट लावण्यांत आली. पश्चिम पंजाबमधून दिल्लीला बदला करण्यांत आलेल्या खात्यांची एकूण बेरीज ४९,११६ आहे. पंजाबमधील ८३ बँकांचे कागदपत्र परत आणण्यांत आले आहेत. वायव्य सरहद्द प्रांतांतील पंजाब नॅशनल बँकेच्या शाखांचे कागद-पत्र रावळपिंडीला आणण्याची परवानगी पाकिस्तानच्या मध्यवर्ती सरकारनें दिली आहे. बँकेच्या गिऱ्हाइकांना कायद्याचीं बंधनें पाळून शक्य तितकी अधिक मदत देण्याचें धोरण बँकेनें स्वीकारलें होतें. निर्वासितांची सोय पहाण्यासाठीं एक खातें मुद्दाम उघडण्यांत आलें. मुख्य कचेरींत ह्या कामासाठीं ऑफिसर व कारकून मिळून १५० लोक खपत होते. लांब मुदतीच्या ठेवींच्या पावत्या, ड्राफ्ट्स, कॅशऑर्डर्स, जुबिली बॉंड्स ह्या संबंधींचीं कागदपत्रें बँकेच्या मुख्य कचेरीकडे आलेलीं नसतांनासुद्धां त्यांच्या तारणावर आगाऊ पैसे मिळण्याची व्यवस्था बँकेनें केली. कागदपत्रें नीट परत आणणें, हिशेबाचीं खातीं बदला करणें, वगैरे कामें करतांना बँकेला बराच खर्च आला; पण त्यामुळें बँकेच्या गिऱ्हाइकांचा विश्वास कायम राहिला.

## किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लि., पुणें

(वार्षिक सभा: २४ जुलै, १९४८)

वरील कंपनीचें सार्वजनिक दृष्ट्या महत्त्व लक्षांत घेऊन, मुंबई सरकारनें खडकी रेल्वे स्टेशनाजवळची ५५ एकर जागा तिचेसाठीं अक्वायर करून दिली. आणखी २० एकर जागा अक्वायर करून मिळण्याविषयीं सरकारबरोबर कंपनीचीं बोलणीं चालू आहेत. आवश्यक तेवढ्या जमिनींचा ताबा मिळतांच कंपनीच्या कारखा-न्याच्या उभारणीस जुलै, १९४७ मध्यें प्रारंभ झाला आणि तें काम आतां पुरें होण्याच्या मार्गावर आहे. विलायतेहून मागवि-लेली बहुतेक यंत्रसामुग्री येऊन दाखल झाली आहे आणि तिच्या उभारणीचे कामास प्रारंभहि झाला आहे. १९४८ साल संपण्या-पूर्वी कारखान्यांतून ५ ते १० अश्वशक्तीचीं इंजिनें बाहेर पडूं लागतील, अशी अपेक्षा आहे. कारखान्यांत उत्पादनास अद्याप प्रारंभ झालेला नाहीं, ह्या दृष्टीनें मॅनेजिंग एजंटसनी (मेसर्स किर्लो-स्कर सन्स आणि कं.) आपला मासिक १,५०० रुपयांचा ऑफिस अलावन्स ३१ मार्च, १९४८ अखेर (ताळेबंदाची तारीख) घेतलेला नाहीं. त्याचप्रमाणें जनरल मॅनेजरनीहि आपल्या वेतना-पैकीं निम्मेच वेतन घेतलें आहे. ह्याबद्दल डायरेक्टरांनीं त्यांचे भागीदारांतर्फे आपल्या रिपोर्टांत आभार मानले आहेत.

### सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांच्या सौजन्याचें रहस्य

हिंदुस्थानास आपलें पौंडी येणें कांहीं कमी रकमेवर तोडावें लागतें काय, अशी भीति वाटत होती; परंतु गुरुवार ता. १५ रोजीं ५ वाजतां (इं. स्टँ टा.) हिंदी अर्थमंत्र्यांनीं हें भूत गाडलें गेलें असल्याचें छातीठोकपणें सांगितलें, त्याच दिवशीं ३ वाजतां (ग्री. मी. टा.) मि. चार्चिल ह्यांनीं हें भूत पार्लमेंटांत उकरून काढलें, आणि ब्रिटिश अर्थमंत्री सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं "स्टर्लिंग शिल-कांचा सबंध प्रश्न (तें देणें कमी रकमेवर तोडण्याचा प्रश्नसुद्धां) १९५१ सालीं पुनः नव्यानें उपस्थित करून चर्चिता येईल" असें जाहीर केलें! १९५१ पूर्वी ग्रेट ब्रिटनमध्यें पार्लमेंटची निवडणूक निश्चित होईल आणि तींत चार्चिल पक्षाचा जय झाला तर उर-लेल्या येण्याचें भवितव्य अनिश्चित झाल्याविना रहाणार नाहीं. हिंदी अर्थमंत्री व ब्रिटिश फडणवीस ह्यांच्या उद्गारांतील विसंग-तीचा दुसरा कोणता अर्थ लावता येणें शक्य आहे? हिंदुस्थानाचें येणें कमी रकमेवर तोडण्याविषयीं ब्रिटिश अर्थमंत्र्यांनीं वाटाघाटींत एक शब्दहि उच्चारला नाहीं, आणि त्या सौजन्याच्या आधारावर हिंदी अर्थमंत्री विसंबून बसले कीं काय? करारामध्यें तसें स्पष्ट जाहीर का करण्यांत आलें नाहीं? ब्रिटिश पौंडाची किंमत पुढें उतरविण्यांत आली, तरी हिंदुस्थानाचें नुकसान होऊं दिलें जाणार नाहीं; सध्याच्या दरानेंच हिंदी देणें दिलें जाईल, अशी एकादी अट करारांत आवश्यक होती, अशीहि करारावर टीका करण्यांत येत आहे.

**सवा कोटी रुपये देऊन गिरणी घेतली**—मधुसुदन मिल्स, लि. च्या बहुसंख्य शेअर्सवरील ताबा दिवाण दिनानाथ प्रभृति मंडळीकडे गेला. आहे. त्यांनीं कंपनीचे ८०% शेअर्स मिळवले आहेत, आणि त्यासाठीं १¼ कोटी रुपये दिले आहेत. ह्या गिरणींत ५५,२०० चात्या व १,७५० माग आहेत.

**बँकांचें विलिनीकरण**—हिंद बँक यूनियन ही बँक ऑफ इंडि-यामध्यें विलीन होणार आहे. हिंद बँकेच्या ५० रुपयांच्या प्रत्येक शेअरसाठीं यूनियन बँकेचे प्रत्येकीं ५ रुपयांचे ५ शेअर्स मिळणार आहेत.

### १५ ऑगस्ट वृक्षारोपण करून साजरा करा

मुंबई सरकारचे शेतकी खात्याचे मंत्री, श्री. एम. पी. पाटील ह्यांनीं २ जुलै रोजीं मुंबई नभोवाणीवरून भाषण करून १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य–प्राप्तीचा दिन लोकांनीं वृक्षारोपण करून साजरा करावा, असें सांगितलें. ते म्हणाले:—"सध्या जगांत सगळीकडे अन्नधान्याचा तुटवडा पडला असल्यामुळें, अन्न-धान्याच्या उत्पादनाकडे व त्याच्या वांटणीकडे सर्वांचें लक्ष लागलेलें आहे. ह्या कार्यक्रमांत शेतकीचा मंत्री ह्या नात्यानें मींहि थोडासा भाग घेतला आहे. तथापि, आज मी या विषयावर फारसें बोलणार नाहीं. जंगल खात्याचा मंत्री ह्या नात्यानें मी आज वृक्षारोपणाची तरफदारी करणार आहें. आपल्या प्रांतांत झाडें लावण्याची फार आवश्यकता आहे. झाडें लावणें व अन्नधान्याची वाढ करणें ह्यांत समतोलपणा राखला तर विरोध येणार नाहीं.

"मुंबई प्रांतांतील क्षेत्रफळापैकीं सुमारें १६ टक्के जमीन जंगलानें आच्छादलेली आहे. ह्यापैकीं फक्त ¾ जमीन आर्थिक दृष्ट्या उत्पादक आहे. त्यांतही उद्योगधंद्यांना उपयोगी पडण्यासारखीं झाडें नाहींतच. मुंबई प्रांतांतील जंगलाचा विस्तार विषम आहे. कारवार जिल्ह्यांत ८० टक्के जमीन सरकारी राखीव जंगलांनीं आच्छादलेली आहे. ह्याच्या उलट, खेडा व अहमदाबाद जिल्ह्यांत जंगलें मुळींच नाहींत. ठाणें व पश्चिम खानदेश ह्यांत ४० टक्के जंगल आहे. कुलाबा जिल्ह्यांत २५ टक्के व नाशिक जिल्ह्यांत २२ टक्के जंगल आहे विजापूर, भडोच, धारवाड, खेडा, पुणें, रत्नागिरी, सोलापूर व सुरत ह्या जिल्ह्यांतून जंगलें फारच कमी आहेत. तथापि, निसर्गानें जी वांटणी केली आहे ती बदलण्याचा प्रयत्न करणें शहाणपणाचें होणार नाहीं. गेल्या महायुद्धांत ह्या प्रांताकडे जळणाचें व इतर लाकूड ह्याची फार मोठी मागणी करण्यांत आली. दरवर्षी जंगलांत होणाऱ्या वाढीपेक्षां ही मागणी किती तरी जास्त होती. जंगलाची झालेली तोड भरून काढण्यासाठीं सरकार सर्व प्रकारचे प्रयत्न करीत आहे. कारण, आपलीं जंगलें म्हणजे भावी पिढ्यांसाठीं आपणाजवळ असणारा ठेवा आहे. आपणास यापुढें आपल्या पायावर उभे राहण्यास शिकलें पाहिजे. सध्याचें सरकार हें लोकांचें सरकार आहे. ज्यांना ज्यांना झाडें लावण्याची इच्छा आहे त्यांना त्यांना सहाय्य करण्याची व शिक्षण देण्याची योजना सरकारनें आंखली आहे. १५ ऑगस्ट हा दिवस आपल्या राष्ट्राच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा आहे. आपलें बळ वाढविण्यासाठीं आणि आपण आपल्या भूमीला मातेप्रमाणें बिलगून राहूं हें दाखविण्यासाठीं त्या दिवशीं आपण वृक्षारोपणाचा कार्यक्रम हातीं घेऊं या. प्रांतांतील २० हजार शिक्षण संस्थांनीं, २१ हजार खेड्यांनीं आणि ३८५ शहरांनीं व इतर संस्थांनींहि त्या दिवशीं झाडें लावावीं अशी विनंति मी करतों. हा कार्यक्रम तुम्ही अंमलांत आणलात तर तुमच्या जमिनीला आकर्षकपणा येईल, आणि तुमच्या पुढच्या पिढ्यांना भरभराटीचे दिवस येतील."

---

### इं. फि. कॉर्पोरेशनच्या शेअर्सवर २½% करमाफ डिव्हिडंड

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे (पहा: अर्थ ता. ३० ६-४८) शेअर्स विक्रीस निघाले आहेत, त्यासाठी विक्री अर्ज ९, १० व ११ ऑगस्ट ह्या दिवशींच फक्त स्वीकारले जातील. शेअर्सवरील २½% करमाफ डिव्हिडंडची व मूळ भांडवलाची हमी सरकारनें घेतली आहे. अर्ज कोणास करता येतील, ह्याची माहिती ३० जूनच्या "अर्थ"च्या अंकांत आली आहे.

दी
**बँक ऑफ कोल्हापूर, लि.**

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर ह्यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्याचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापना: १९२६
मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.


तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | १०,१६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,७१,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,०७,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर
(४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी
(७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई
(१०) मांडवी–मुंबई.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींतील सेफ डिपॉझिट लॉकर्सच्या उत्तम व्यवस्थेचा फायदा घ्या.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## स्टर्लिंग शिलकीच्या परतफेडीबद्दल करार

( भा. म. काळे )

स्टर्लिंग शिलकीच्या परतफेडीबद्दल करार करावयास अर्थमंत्री श्री. चेट्टी लंडनला गेले होते, व तेथें ब्रिटिश सरकारशीं वाटाघाटी करून तीन वर्षांचा करार करण्यांत आला आहे व त्याच्या अटी नुकत्याच प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या अटी व एकंदर स्टर्लिंग कर्जाच्या स्वरूपाबद्दल व लंडन येथें वाटाघाटींत आलेल्या अनुभवाबद्दल, अर्थमंत्र्यांनीं गुरुवारीं जें निवेदन केलें त्यावरून एकंदर करार साधारणपणें आजच्या परिस्थितींत समाधानकारक झाला आहे असें म्हटलें पाहिजे. याबद्दल पहिली गोष्ट ही कीं स्टर्लिंग कर्ज आजिबात अमान्य करावें, किंवा निदान तें युद्धकर्ज समजून त्याच्या रकमेंत बऱ्याच प्रमाणांत कपात केली जावी असें मत चर्चिल इ. कडून निःसंदिग्धपणें प्रतिपादलें जात होतें त्या मताला वाटाघाटींत मुळींच स्थान मिळालें नाहीं. सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं स्टर्लिंग कर्जांत कपात करण्याचा मुद्दा मुळींच उपस्थित केला नाहीं. कदाचित् 'स्वतंत्र हिंद'च्या अस्तित्वाचा हा परिणाम असावा. दुसरी गोष्ट ही कीं अजूनपर्यंत दर सहामाहीला किंवा दरवर्षी किती स्टर्लिंग हिंदुस्थानला दिलें जाईल एवढाच विचार केला जात असे, परंतु आतां हिंदुस्थानमध्यें राहिलेल्या ब्रिटिश मालकीचे लष्करी साठे व तत्सम गोष्टी हिंदनें खरेदी कराव्या, व ह्या गोष्टींची किंमत म्हणून रु. १३३ कोटींची रक्कम १ एप्रिल १९४७ रोजीं हिंदुस्थानच्या हातीं आलेल्या लष्करी साहित्याचा मोबदला म्हणून स्टर्लिंग कर्जांतून वळती करण्यांत यावी असें ठरलें आहे. त्यानंतर दुसरी गोष्ट म्हणजे इंग्लंडमध्यें वास्तव्य करणाऱ्या नोकर लोकांच्या पेन्शन्ससाठी आपल्याला बरीच रक्कम खर्चीं घालावी लागते. अर्थात् ही रक्कम दरवर्षी थोडथोडी कमी होत जाते. त्या पेन्शन्सच्या खर्चासाठीं येत्या कांहीं वर्षांत द्याव्या लागणाऱ्या एकूण रकमेची आजची किंमत रु. १९७ कोटी भरते. ही सर्व रक्कम स्टर्लिंग कर्जांतून फेडली जाईल. ही रक्कम पुढील आठ वर्षांत वार्षिक हप्त्यांनीं फेडली जाईल. प्रांतिक सरकारांनाहि पेन्शन्ससाठी इंग्लंडमध्यें खर्च करावा लागतो. त्यासाठी एकंदर रु. २७ कोटी स्टर्लिंग कर्जांतून वळते केले जातील.

स्टर्लिंग कर्जानें युद्धकाळानंतर सुमारें १७ शें कोटी रुपयांचा उच्चांक गांठला होता, परंतु गेल्या दोन वर्षांत विशेषतः अन्नाच्या आयातीवर इ. फार खर्च करावा लागल्यामुळें सध्यां स्टर्लिंग कर्जाची रक्कम रु. १५४७ कोटी इतकी आहे. यापैकी सुमारें रु. ३५७ कोटी इतकी रक्कम युद्ध-साहित्य व पेन्शनें या बाबतींत द्यावयाच्या रकमा म्हणून फेडली जाईल.

एक जुलै १९४८ पासून तीन वर्षांत स्टर्लिंग कर्जांतून एकंदर रु. २१२ कोटी हिंदुस्थानला प्रत्यक्ष दिले जातील. म्हणजे कोणत्याहि चलनामध्यें परराष्ट्रांची देणीं फेडण्यासाठीं यापैकीं हिंदुस्थानला खर्च करतां येतील. ही परिस्थिति एकंदर समाधानकारक म्हटली पाहिजे. कारण गेल्या एका वर्षांत इंग्लंडकडून ८ कोटी ३० लक्ष पौंड स्टर्लिंग उपलब्ध झालें असतां त्यापैकीं फक्त ३० लक्ष पौंड खर्चण्यांत आले असा खुलासा श्री. कृष्णमाचारी ह्यांनीं सरकारतर्फे केला, म्हणजे ८ कोटी पौंड रक्कम तशीच पडून आहे. तेव्हां पुढील तीन वर्षांत ही ८ कोटी पौंडांची रक्कमहि आपणाला मिळावयाची आहे. या ठिकाणीं असा प्रश्न उद्भवतो कीं, इतकी रक्कम मिळूं शकत असतांहि हिंदी कारखानदारांनीं यंत्रसामुग्रीची आयात कां केली नाहीं ? उद्योगधंद्यांच्या भवितव्याबद्दल १९४७ च्या बजेटपासून जें साशंक वातावरण निर्माण झालें त्याचा हा परिणाम असावा. परंतु आतां एप्रिल महिन्यांत सरकारचें औद्योगिक धोरण निश्चित शब्दांत जाहीर झाल्यापासून, अर्थमंत्र्यांनीं बजेटमध्यें दिलेल्या करविषयक सवलतीमुळें व त्यांनीं वेळोवेळीं स्पष्ट शब्दांत केलेल्या खुलाशामुळें, व डिसेंबरमध्यें मालक व मजूर यांमध्यें मान्य झालेल्या औद्योगिक शांततेच्या धोरणामुळें, यापुढें उद्योगपतींना निराश किंवा साशंक होण्याचें मुळींच कारण नाहीं. आतां यापुढें जरूर त्या यंत्रसामुग्रीची इंग्लंडमधून आयात आपल्या उद्योगपतींनीं केली पाहिजे. नवीन निघणाऱ्या उद्योगधंद्यांना यंत्रसामुग्री पाहिजेच आहे. परंतु कापड, साखर, सिमेंट इ. अनेक जुन्या कारखान्यांची जीर्ण व कमी उपयुक्त झालेली यंत्रसामुग्री बदलणें फार आवश्यक आहे. याहि गोष्टीचा आपल्या उद्योगपतींनीं विचार करावा. परराष्ट्रीय चलन उपलब्ध नसल्यामुळें यंत्रसामुग्री आणतां येत नाहीं अशी ओरड कारखानदारांकडून अनेक वेळां केली जात असे. त्यामध्यें कितीसा सत्याचा अंश होता हें वरील सरकारी खुलाशावरून स्पष्ट होत आहे.

परराष्ट्रीय हुंडणावळीबद्दल यापुढें परिस्थिती समाधानकारक राहील असा अर्थमंत्र्यांचा विश्वास आहे. पुढील तीन वर्षांत निर्यात व्यापारामुळें व इतर गोष्टींमुळें रु. १७०० कोटी खर्च करण्याची ताकद हिंदुस्थानला येईल. यामुळें यंत्रसामुग्रीच्या आयातीच्या धोरणावरच भर देणें परिणामीं फायद्याचें ठरेल. यंत्रसामुग्री खरेदी केली नाहीं तर चैनीच्या किंवा इतर किरकोळ मालावर ही रक्कम खर्च करावी लागेल, व ही स्थिती देशाच्या भावी आर्थिक हिताच्या दृष्टीनें योग्य नव्हे.

येथें उल्लेखिलेल्या जमेच्या सर्व बाजू विचारांत घेतां व त्या स्टर्लिंग कर्जांतून वजा करतां, अद्याप सुमारें रु. १०६७ कोटी रक्कम उरते. त्या रकमेपैकी रु. २६७ कोटी करन्सी रिझर्व्ह म्हणून समजणें इष्ट आहे. ती वजा केली असतां रु. ८०० कोटी स्टर्लिंग कर्ज शिल्लक राहातें, व त्याच्या परतफेडीबद्दल पुढें योग्य वेळीं करार होईल.

---

**निर्वासितांसाठी सहकारी डेअरी**—मध्यप्रांत सरकारनें छिंदवाडा येथें निर्वासितांना साह्य करण्यासाठी एक सहकारी डेअरी काढली आहे. ह्या डेअरींत सिंध व पश्चिम पंजाबमधील १५० निर्वासित कुटुंबें काम करणार असून, तीसाठी १ लाख रुपयांचें भांडवल लागणार आहे.

**पोलादाचें उत्पादन व टाटा शेअर्स**—पोलादाचे कारखाने उभारून पोलादाचें वार्षिक उत्पन्न सत्वर वाढविण्याचा सरकारचा निश्चय अंमलांत येणार, ह्या कारणामुळें टाटा कंपनीच्या भागांची खरेदी करण्यापेक्षा विक्री करणारेच ज्यास्त झाले आहेत.

**बँकेची शाखा बंद**—ता. २१ जुलै पासून सिकंदराबाद येथील आपली शाखा बंद करण्याचा निर्णय बँक ऑफ बिकानेरनें घेतला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ आणि हैद्राबाद स्टेट बँक ह्यांनीं एकमेकांच्या चलनांच्या बदल्याला बंदी केल्यामुळें तेथील व्यापाराला चांगलाच धक्का बसला आहे. त्यामुळें बँकांच्या व्यवहारांत मंदी आली आहे. अशा परिस्थितींत आणखीही कांहीं बँका आपल्या हैद्राबादमधील शाखा बंद करणार आहेत अशी वार्ता आहे.

**पाकिस्तानांत झेक सरकारची वकिलात**—झेकोस्लोव्हाकियाच्या सरकारनें कराची येथें आपली वकिलात उघडण्याचें ठरविलें आहे, असें समजतें.

**निर्वासितांची वसाहत**—जबलपूरपासून ६० मैलांवर कटणी येथें ४० हजार सिंधी निर्वासितांची एक वसाहत वसविण्याची व्यवस्था मध्य-प्रांत सरकारनें केली आहे.

## ब्रिटिश वृत्तपत्रांचा आर्थिक संसार

न्युजप्रिंट कागदाची किंमत वाढल्याकारणानें ब्रिटिश वृत्तपत्रांचा उत्पादन खर्चहि पुष्कळ वाढत गेला आहे. खालील तक्त्यांत डेली एक्सप्रेस गटांतील वृत्तपत्रांच्या उत्पादन खर्चाचे तुलनात्मक आकडे दिले आहेत. १९३७ साली कागद व शाई ह्यांनीं एकूण खर्चाच्या २७% इतकी रकम खाल्ली; १९४६–४७ मध्यें वृत्तपत्रांचीं पृष्ठें विसावरून चारावर आलीं, तरी सुद्धा कागद व शाई ह्यांस एकूण खर्चाच्या २६% रकम लागली. वृत्तपत्रांचा खप मात्र वाढला आहे.

### डेली एक्सप्रेस गटाचा उत्पादन खर्च

| १९३७ | % | १९४६–४७ | % |
|---|---|---|---|
| कागद व शाई | २७ | कागद व शाई | २६ |
| उत्पादन | १४ | पगार | ४४ |
| संपादक खातें | १२ | वृत्त संस्था | ५ |
| वाटप | १३ | वाटप | ८ |
| प्रचार | १० | प्रचार | १ |
| इतर | २४ | इतर | १६ |
| | १०० | | १०० |

### प्रमुख वृत्तपत्रांचा खप

| दैनिकें | युद्धापूर्वी | १९४७ |
|---|---|---|
| डेली एक्सप्रेस | २३,२९,००० | ३८,६०,००० |
| डेली मेल | १५,८०,००० | २०,७८,००० |
| डेली हेरल्ड | २०,००,००० | २१,३१,००० |
| न्यूज-क्रॉनिकल | १३,२४,००० | १६,२३,००० |
| डेली मिरर | १३,६७,००० | ३७,०६,००० |
| दि टाइम्स | १,९२,००० | २,४९,००० |
| डेली टेलिग्राफ | ६,३७,००० | ९,१३,००० |
| **साप्ताहिकें** | | |
| न्यूज ऑफ दि वर्ल्ड | ३०,००,००० | ७८,९१,००० |
| दि पीपल | २४,००,००० | ४६,७१,००० |
| संडे एक्सप्रेस | ९,२७,००० | २३,५३,००० |
| संडे डिस्पॅच | ११,९७,००० | २०,६५,००० |
| रेनॉल्डस् न्यूज | ४,२०,००० | ७,१७,००० |
| ऑबझर्व्हर | २,०१,००० | ३,८३,००० |

### जाहिरातींचे वाढलेले दर

पूर्वी जाहिरातींसाठी मुबलक जागा उपलब्ध असे, त्यामुळें जाहीर केलेल्या दरापेक्षा कमी दरानें जाहिरातदार जाहिराती देऊं शकत. आतां परिस्थिति उलट आहे; त्यांना ह्या नाहीं, त्या प्रकारें २५% जास्त आकार द्यावा लागत आहे. वृत्तपत्रांचा खप वाढला असल्यामुळें हीं खातीं व त्यांचें उत्पन्नहि वाढलें आहे. लोकांना सार्वजनिक घडामोडींची ताजी माहिती हवी असते आणि ही प्रवृत्ति वाढत आहे, त्याचें हें लक्षण आहे.

खालील तक्त्यांत कांहीं प्रमुख वृत्तपत्रांचे जाहिरातींचे दर दिले आहेत.

| | दर सिंगल कॉलम इंचास (पौंड) १९३७ | १९४७ |
|---|---|---|
| डेली एक्सप्रेस | ६½ | २० |
| डेली मेल | ६ | १५ |
| डेली हेरल्ड | ६ | १५ |
| न्यूज क्रॉनिकल | ४½ | १२ |
| डेली मिरर | ५½ | १४½ |
| दि टाइम्स | ३ | ६ |
| डेली टेलीग्राफ | ५ | ११ |

डेली एक्सप्रेसचा जाहिरातींचा दर प्रत्येक सिंगल कॉलम इंचास सुमारें पावणे तीनशे रुपये पडतो !

### नफा व डिव्हिडंड

इतके भारी दर आकारूनहि जाहिराती नाकारण्याची पाळी येते, कारण वृत्तपत्रांची पृष्ठसंख्या अत्यंत मर्यादित झाली आहे. तेव्हां हे दर आणखीहि वाढविले जाण्याचा संभव आहे. जाहिरातींचे दर वाढले तरी जाहिरातींच्या वाट्यास येणारी पृष्ठसंख्या मर्यादित असल्याकारणानें जाहिरातींचें एकूण उत्पन्न घटलेंच आहे. कांहीं प्रमुख वृत्तपत्र कंपन्यांच्या नफ्याचे व डिव्हिडंडचे आकडे खाली दिले आहेत:—

| कंपनी | १९४६–४७ मधील नफा (पौंड) | डिव्हिडंड % |
|---|---|---|
| असोसिएटेड न्यूजपेपर्स | ४,४४,१३४ | २० |
| केम्सले न्यूजपेपर्स | १८,७५,५०१ | १२ |
| डेली मिरर | ४,७६,८४३ | ३० |
| लंडन एक्सप्रेस न्यू. पे. | ६,१२,५९२ | १५ |
| ओडहॅम्स प्रेस | १२,११,३१२ | १७½ |

शेअर्सच्या बाजारभावावर सरासरीनें ६% व्याज सुटतें.

### शेअर बाजार

शेअर बाजारांतील मंदी दलालांना चांगलीच जाणवूं लागली आहे. मुंबईमधील आपल्या कचेऱ्या चालू ठेवणेंहि कित्येकांना अवघड जात आहे. मुंबई बाहेरील उप–दलालांच्या अंगावर तो खर्च पडत नसल्याकारणानें, त्यांना फायदा झाला नाहीं तरी खर्चाचीं तोंडें तरी ते तात्काळ थांबवूं शकतात. शेअर बाजाराच्या सभासदांना मात्र किमान खर्च टाळतां येत नाहीं. अशा परिस्थितींत, शेअर दलालांच्या कार्डाची किंमत दोन वर्षांपूर्वीच्या मानानें आतां निम्म्यावर उतरली असल्यास नवल नाहीं. ह्याचा अर्थ, नव्यानें धंदा सुरू करावयास पुढें येणारे फारसे उरले नाहींत, असाच होतो. शेअर्समधील चढ–उतार इतकी अल्प आहे, कीं त्यामुळें स्टॅंपड्यूटी व इतर खर्च चढवून व्यवहारच करतां येत नाहीं.





### मुंबई प्रांतांतील उत्पादकांच्या सहकारी सोसायट्या
### ( १९४५-४६ चा सरकारी अहवाल )

युद्धसमाप्तीनंतरहि जीवनोपयोगी जिनसांचा तुटवडा कायम राहिल्यामुळें, उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांस चालना मिळत गेली. अशा सोसायट्यांची संख्या ४४ ची ६९ झाली. विणकरांच्या सोसायट्या व औद्योगिक असोसिएशन्स ह्यांचा त्यांत समावेश नाहीं. उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेल्या मालास मागणी चांगली होती. त्यामुळें त्यांनीं नफाहि चांगला मिळविला.

| | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| सोसायट्यांची संख्या | ४४ | ६९ |
| त्यांचे सभासद | ४,१२९ | ९,७७२ |
| | रु. | रु. |
| खेळतें भांडवल | ४,३९,००१ | ११,१२,८८६ |
| नफा | २०,५२७ | १,१४,९३५ |

कारवार जिल्ह्यांत उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं चांगली प्रगति दाखविली. तेथें १७ सोसायट्या आहेत, त्यांपैकीं ७ तर एकट्या होनावर शहरांत आहेत.

विणकरांच्या सोसायट्यांनीं १९४५-४६ मध्यें विशेष प्रगति दाखविली. ह्या संस्थांची संख्या ९५ ची १२० झाली व त्यांचें खेळतें भांडवल २१½ लक्ष रुपयांचें २४½ लक्ष रुपये झालें. त्यांच्या विक्रीचा आकडा ५९ लक्ष रुपयांवरून १ कोटी, ९४ लक्ष रुपयांवर गेला आणि नफ्याची रक्कमहि १,४३,८७० रुपयांची ३,४६,९६३ रु. झाली. नफ्यांतील वाढीचें मुख्य कारण सुताच्या वाटपाचें त्यांस मिळालेलें काम, हें होय. कापडाच्या टंचाईमुळें विणकरांच्या मालास किंमत चांगली आली. वाईट परिस्थितींतील कित्येक सोसायट्या आपलें बुडित व संशयित कर्ज वसूल करून आपली परिस्थिति सुधारूं शकल्या.

---

### दि बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेस १९४८ च्या पहिल्या सहामाहींत ३६, ६९, ७९७ रु. ९ आ. ५ पै नफा झाला. ह्या हिशेबांत कराची तरतूद घेतलेली नाहीं. गेल्या हिशेबांतील ७, ८५, ३५१ रु. ८ आ. ३ पैचा शिलकी नफा त्यांत मिळवला, म्हणजे ४४, ५५, १४९. रु. १ आ. ८ पै. बेरीज होते. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें डायरेक्टरांनीं केला आहे:—

१२% ( प्रत्येक भागास ३ रु. ) ह्याप्रमाणें १, ५०, ००, ००० रुपये वसूल भांडवलावर ३० जून, १९४८ अखेरच्या सहामाहीचें करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ९,००,००० रु.; पुढील सहामाहीचे हिशेबांत ओढण्यासाठी ३५, ५५, १४९ रु. १ आ. ८ पै ( ह्यांतून कर दिला जाईल. )

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)**
पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.
मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

नवीन पुष्कळ निघाले, तरी
**तुळजाराम मोदी, सातारा**
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**
**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,११,८९० |
| खेळतें भांडवल | रु. | ६६,५०,००० |

मुंबई शाखा:—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. म. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.